# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./३८२५/२०१९ दि.२४/०९/२०१९

## परिपत्रक

विषय :- शिष्यवृत्ती फ्रिशिप स्वीय प्रपंजी लेख्याची तपासणी करणेबाबत.

संदर्भ :- मा. सहाय्यक आयुक्त, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, गडचिरोली, यांचे पत्र क्र.सआसक/गड/शिष्यवृत्ती/विशेष चौ.पथक/२०१९-२०/११९७, दिनांक १७/०९/२०१९

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठातंर्गत पदव्युत्तर शैक्षणिक विभाग तसेच विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण फी परिक्षा फी या योजनेचे आर्थीक व्यवहार असणाऱ्या स्वीय प्रपंजी लेख्याचे सन २००६-०७ पासून तपासणी करण्यासाठी संचालनालयातील सहसंचालक लेखा व कोषागारे यांचे नियंत्रणाखाली तपासणी पथक निर्माण करण्यास शासन परिपत्रकात सुचना दिल्यानुसार मान्यता दिली असुन जिल्हयातील कोषागार कार्यालयातील कार्यरत स्वीय प्रपंजी लेखा प्रशासकाच्या व्यवहाराची तपासणी सन २००६-०७ पासुन करण्यात यावी असे आदेश आहेत.

त्याअनुषंगाने विद्यापीठाच्या अधिनस्त गडचिरोली जिल्हयातील शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित/शाळा, संस्थांनी सन २००६-०७ ते २०१६-१७ पर्यंतचे संदर्भीय पत्रामध्ये नमुद आवश्यक संपुर्ण दस्तऐवज/अभिलेख तपासणीच्या अनुषंगाने तपासणीच्या वेळी पथकाला अद्यावत करून देण्यात यावे.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये निर्देशीत केले असल्याने उक्तबाबीनुसार आपल्यास्तरावर आवश्यक कार्यवाही घ्यावी.

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
कुलसचिव

सहपत्र - संदर्भीय पत्र संलग्नित.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) मा. विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) सांख्यिकी सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
५) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग.
कार्यालय-सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, गडचिरोली.
डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, एल.आय.सी. रोड गडचिरोली.
E-Mail-sdswog@gmail.com 07132-222192


क्र.सआसक/गड/शिष्यवृत्ती/विशेष चौ.पथक/२०१९-२०/1197 दिनांक :- 6/०९/२०१९


गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
आवक 21372 17/9/19
जावक 21372 17/9/19

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक 5846 17/9/19
9304 18/9/19

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आवक क्र. 3447 18.9.19
जावक क्र.........दि.........


प्रति,
मा. कुलसचिव,
गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली.

विषय :- शिष्यवृत्ती फ्रिशिप स्वीय प्रपंजी लेख्याची तपासणी करणेबाबत

संदर्भ :-मा.प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग नागपूर यांचे पत्र क्र.२४६४ दि. २९/०८/२०१९

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, संदर्भिय पत्रान्वये भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण फी परिक्षा फी या योजनेचे आर्थीक व्यवहार असणाऱ्या स्वीय प्रपंजी लेख्याचे सन २००६-०७ पासुन तपासणी करण्यासाठी संचालनालयातील सहसंचालक लेखा व कोषागारे यांचे नियंत्रणाखाली तपासणी पथक निर्माण करण्यास शासन परिपत्रकात सुचना दिल्यानुसार मान्यता दिली असुन जिल्ह्यातील कोषागार कार्यालयातील कार्यरत स्वीय प्रपंजी लेखा प्रशासकाच्या व्यवहाराची तपासणी सन २००६-०७ पासुन करण्यात यावी असे आदेश आहेत.

त्यानुषंगाने आपले विद्यापीठाच्या अधिनस्त गडचिरोली जिल्ह्यातील शासकीय/अनुदानित/विनाअनुदानीत/शाळा, संस्थांची सन २००६-०७ ते २०१६-१७ पर्यंतचे खालीलप्रमाणे नमुद आवश्यक संपुर्ण दस्तऐवज/अभिलेख तपासणीच्या अनुषंगाने तपासणीच्या वेळी पथकाला अद्यावत करुन देण्यात यावे. याबाबत आपले स्तरावरुन संबंधित महाविद्यालयांना सुचित करण्यात यावे, हि विनंती.

१. कोषागार कार्यालयानी स्विय प्रपंजी लेखा उघडण्याबाबत दिलेल्या मान्यतेची प्रत.
२. स्वीय प्रपंजी लेख्याच्या व्यवहाराची लेखांकन नोंदवही (रोखवही इ.).
३. संबंधीत संस्थेच्या प्रशासकाची/कार्यालय प्रमूख यांची नमूना स्वाक्षरी.
४.जमा खर्चाच्या नोंदीसंबंधी आवश्यक असलेले पासबूक व इतर अभिलेख.
५. रोखवही, पासबुक,शासन पावती, पुस्तक चलान प्रत इत्यादी.
६. प्राप्त झालेल्या रकमा बँकेत किंवा कोषागारात भरणा करण्याऐवजी सदर रकमा विभागाच्या देणी भागविण्याकरीता वापर करण्यात आला असेल. तेव्हा स्थुल जमा रकमा व त्यामधून देण्यात आलेल्या रकमा यांसबंधी नोंदवही.
७. स्वीय प्रपंजी लेख्यामधून मागिल एक आर्थिक वर्षापासून व्यवहार होत नाही अशा लेख्याची नोंदवही.
८.स्वीय प्रपंजी लेख्याच्या प्रशासकाच्या आर्थिक व्यवहारासंबंधी आवश्यक सर्व अभिलेखे.
९. स्वीय प्रपंजी लेख्याच्या प्रशासकांनी कोषागार/उपकोषागार यांचेकडे वैयक्तीक ठेव लेख्याचे ताळमेळ घेवून शिल्लकी प्रमाणपत्र कोषागार अधिकारी यांचेकडे पाठवून महालेखापाल नागपूर यांना सादर केले आहे काय?

उ.कु. (आस्था)
संलग्नित महाविद्यालये व पदव्युत्तर विभाग यांना याबाबत कळवावे.
18/9/19

18/9

१०.सन २००६-०७ ते २०१०-११ या ५ वित्तीय वर्षात मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती आणि शिक्षण फी/परीक्षा फी योजनेच्या सर्व लेखाशिर्षाखाली योजनेत्तर व योजनांतर्गत वर्षनिहाय कोषागारातुन काढलेल्या रकमांचे वर्षानिहाय प्रपत्र तयार ठेवण्यात यावे.

११. ज्या कॉलेज/संस्थानी अखर्चित/विनावाटप रकमा चलानने कोषागारात जमा केल्या आहेत अश्या चलनाच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

१२. संस्था प्रमुखांनी स्वियप्रपंजी लेखा पासबुक व इतर वाटपाच्या नोंदवह्या/लेखे अद्यावत उपलब्ध ठेवावे.

करिता आपले माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.

आपला विश्वासु

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, गडचिरोली

प्रतिलिपी माहितीस्तव सादर :-
मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, नागपूर.

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, गडचिरोली